नि.दि.दा.क्र.१९८/२०२१
नि.क्र.४४

**पुढील सरतपास वादीकरीता विधीज्ञ श्री. व्ही.एच. शेळके यांच्या वतीने शपथेवर सुरु -**

आता मला नि.क्र.३/३ वरील दि.२९/०८/१९४७ रोजीच्या गहाणखताची प्रमाणित प्रत दाखविली असता सदरचे दावा मिळकतीचे गहाणखत कासूबाई तुकाराम चितळकर यांनी कुंडलिक लिंबाजी पारखे यांच्या हक्कात लिहून दिले होते. या गहाणखता आधारे कुंडलिक लिंबाजी पारखे यांना दावा मिळकतीचा कब्जा मिळालेला नव्हता. सदरचे गहाणखत न्यायालयाने नि.दि.दा.क्र.४५४/१९७८ मधील निकालाद्वारे रद्द केले होते. आता मला नि.क्र.३/४ वरील दि.०६/१०/१९५६ रोजीच्या भाडेपट्टा कराराची प्रमाणित प्रत दाखविली असता सदरचे दावा मिळकतीचे भाडेपट्टा करार भागवत कोंडीबा हिवरकर यांनी कुंडलिक लिंबाजी पारखे यांच्या हक्कात लिहून दिले होते. मुळ दस्त सापडल्यास मी दाखल करणार.

मी नि.क्र.४३/८ ते नि.क्र.४३/१४ वर प्रवरानगर येथील पद्श्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सह. सा.कारखान्याच्या पावत्या दाखल केल्या आहेत. सदर पावत्या या दावा मिळकतीमधील ऊस त्या कारखान्याला पाठविल्याबाबत त्या कारखान्याने दिलेल्या पावत्या आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपासाकरीता तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.09.17 17:08:45 +0530

(आशिष बि. मरलेचा)

दिनांक १७/०९/२०२५

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर